MHGO060011682022

-

## न्यायनिर्णय

(दिनांक ०३/०९/२०२४ रोजी पारीत.)

या प्रकरणातील अभियोग पक्षाचे कथन व अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेला पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ आहेत व त्या मुद्दयांवर मी खालील दिलेल्या कारणासाठी माझे निष्कर्ष नोंदवित आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. दि.२९/०९/२०२२ रोजी १६.०० ते १६.३० वाजताच्या सुमारास मौजा गवर्रा, ता. अर्जुनी/मोरगांव, जि. गोंदिया येथे परवाना नसतांना आरोपीच्या घरातुन ०९ नग देशी दारुचे पव्वे मिळून आले व त्याव्दारे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) ७७(अ) अन्वये गुन्हा केला आहे, हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | ... | नाही. |
| २. आदेश काय ? | ... | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

२. अभियोग पक्षाने आरोपीविरुद्ध दोषारोपीत करण्यात आलेला गुन्हा सिद्ध करण्याकरिता पंच सा.क्र.१ भास्कर पांडुरंग कान्हेकर व फिर्यादी सा. क्र. २ पो.शि. धनराज मोडकु सार्वे यांना तपासले आहे. पुरेशी संधी देवूनही अभियोग पक्ष तपासी अधिकारी यांना तपासण्यात अपयशी ठरले. त्यामुळे नि.१ वर आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. आरोपीविरूद्ध पुरावा अभिलेखावर असल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये आरोपीचे बयाण नोंदविण्यात आले. आरोपीने त्यांचे बाजूने कोणताही साक्षीदार तपासला नाही.

**मुद्दा क्र.१ करिता** :

३. फिर्यादी सा. क्र. २ पो.शि. धनराज मोडकु सार्वे यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की, दिनांक २९.०९.२०२२ ला ते पोलीस स्टेशन केशोरी येथे पो.शि. म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी बिट पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिराकडुन माहिती मिळाली की, आरोपी आपल्या घरी अवैद्यरीत्या देशी दारुची विक्री करीत आहे. त्या अनुषंगाने ते, त्यांचा स्टाफ व दोन पंचासह आरोपीच्या घरी गेले असता आरोपी त्याच्या घरी हजर मिळून आला. त्याला घरी येण्याचे कारण सांगून स्वतःची व पंचांची अंगझळती देवून त्याच्या घराची दारुबाबत घरझळती घेतली असता त्याच्या घराच्या माजघरात एका प्लास्टीक पिशवीमध्ये ९ नग देशी दारुचे सिलबंध पव्वे मिळून आले. पंचानी व त्यांनी वास घेतला असता ते दारु असल्याचे लक्षात आले. सदर दारु त्यांनी जप्त केली व ९० एमएलचा नमुना सि ए साठी वेगळा काढला. बाकी माल पोलिस स्टेशनला जमा केला. त्यानंतर त्यांनी तक्रार दिली. त्यांनी नि. क्र. ११ वर तक्रार व नि. क्र. १२ वर प्रथम छापिल खबर शाबीत केले. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलट तपासात असे मान्य केले आहे की, त्यांनी स्वतःहुन कोणतीही जप्ती केली नाही. तसेच त्यांनी कोणतेही पंचनामे केले नाही. तसेच त्यांना नमुना बॉटलचा सिल बंदचा पंचनामा केला नाही.

४. पंच सा.क्र.१ भास्कर पांडुरंग कान्हेकर यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की,पोलिसांनी त्यांना पंचनाम्याकरीता आरोपीच्या घरी मौजा गवर्रा येथे बोलाविले होते. पोलिसांनी त्यांच्या समक्ष आरोपीकडून ९ नग देशी दारु प्रत्येकी ९० एमएल जप्त केली होती. पोलिसांनी त्यांच्या समक्ष जप्ती पंचनामा केला होता. त्यांनी जप्ती पंचनामा नि.क्र. ९ वर शाबीत केला.

५. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने एक पंच साक्षीदार व फिर्यादी पोलिस कर्मचारी यांची साक्ष नोंदविलेली आहे. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीच्या घरातुन मौका जप्ती पंचनाम्या प्रमाणे ०९ नग देशी दारुचे पव्वे जप्त करण्यात आले. परंतु

ज्या ठिकाणी छापा टाकण्यात आला त्यावेळी सरकार पक्षाने सदरचे घर हे आरोपीच्या मालकीचे होते याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात रासायनिक पृथकरण अहवाल दाखल आहे. जप्त नमुना ज्या कर्मचाऱ्याने न्याय सहाय्यक प्रयोग शाळा येथे विश्लेषणाकामी नेला त्यांचा पुरावा अभियोग पक्षाने नोंदविला नाही. त्यामुळे जप्त नमुना सोबत कोणती छेडछाड झाली होती किंवा नाही हे स्पष्ट करणारा पुरावा अभियोग पक्षाने सादर केला नाही. या सर्व कारणांमुळे आरोपीविरूध्द ठेवलेला आरोप संशयातीत शाबीत होत नाही. त्यामुळे आरोपी हे संशयाचा फायदा मिळविण्यास पात्र आहेत.

६. फौजदारी विधी तत्वानुसार संशयाच्या पलिकडे जावुन गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची आहे. खटल्यात अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा समंजस संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द केला नाही. तसेच रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर जरी दाखल केला तरीही आरोपीच्या घरातुन त्यातील द्रव्य जप्त झाले असा पुरावा नसल्याने सदर अहवाल उपयोगी ठरत नाही. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून असे स्पष्टपणे दिसुन येते की, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) ७७(अ) अन्वये लागु होण्यासाठी आवश्यक असणारे घटक अभियोग पक्षाने संशयाच्या पलिकडे जावुन आरोपीविरूध्द सिध्द केले नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी प्रदिप पंचमदास कानेकर याला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) ७७(अ) अन्वये गुन्हा केलेल्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीने दिलेले जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल मिळकत ०९ नग देशी दारुचे पव्वे विल्हेवाटीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग गोंदिया यांच्याकडे अपिल कालावधी संपल्यानंतर पाठविणेत यावा.

४. आरोपीने अपील दाखल झाल्यास अपील न्यायालयासमोर हजर राहील याकरीता तिने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे अपील कालावधीपर्यंत रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जातमुचलका सादर करावा.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

**स्वा /–**
( एन.व्ही. साहू )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय अर्जुनी/मोरगांव.

अर्जुनी/मोरगांव.
दिनांक : ०३.०९.२०२४